## यंत्रमागधारकांना ऑनलाईन नोंदणी अर्ज करतांना येणा-या अडीअडचणीबाबतचे (FAQ ) प्रश्नावली

**१. माझा / आमचा यंत्रमाग उद्योग अल्पसंख्यांक / इतर मागासवर्गीय व मागासवर्गीय घटकातील आहे. आणि यंत्रमाग घटकाशी संबंधित चालक / मालक / संचालक अशिक्षित वा अल्पशिक्षित असल्याने यंत्रमाग घटकाची नोंदणी ऑनलाइन अथवा ऑफ लाइन पद्धतिने करणे शक्य नाही.**

- शासनाने २७ HP खालील यंत्रमाग घटकासाठी अत्यंत सुलभ व सोपा ऑनलाईन नोंदणी अर्ज उपलब्ध करून दिलेला आहे. संगणक / मोबाईल वापरणारी कोणतीही व्यक्ती अथवा विद्यार्थी देखील वस्त्रोद्योग विभागाच्या https://www.dirtexmah.gov.in/index_en.php या संकेत स्थळावर जाऊन online अथवा मोबाईल ॲप व्दारे नोंदणी करु शकतात.
- यंत्रमाग घटक (27 HP below)संकेतस्थळावरून नोंदणी अर्ज व 1 ते 5 प्रमाणपत्र download करून प्रादेशिक उपायुक्त वस्त्रोद्योग यांना offline पद्धतीने अर्ज सादर करू शकतात.

**२. वीज सवलत करिता दरवर्षी नोंदणी करावी लागेल.**

- वीज सवलत प्राप्त होणेकरिता फक्त एकदाच नोंदणी करावयाची आहे.

**३. उद्यम रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र नाही.**

- आपल्या उद्योगाची नोंदणी ज्या प्राधिकरणाअंतर्गत झाली आहे त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे. सदरहू प्रमाणपत्र शासनाव्दारे घोषित होणा-या सर्व योजनाकरीता आवश्यक असणार आहे . तथापि सदरहू प्रमाणपत्र घटकाकडे उपलब्ध नसल्यास खालील पध्दतीने उद्यम प्रमाणपत्र नोंदणी करता येवू शकते.

अ)आपल्या जवळ असणारे आधार कार्ड आणि पेन कार्ड सोबत ठेऊन आपण स्वत: online प्रक्रियेद्वारे https://udyamregistration.gov.in/Government-India/Ministry-MSME-registration.htm या वेब साईट वर login करून स्वत: उद्यम रजिस्ट्रेशन करू शकतात.

आ) जवळच्या महा ई कंद्र सेवा अथवा सायबर कॅफे मध्ये जाऊन आपण आपल्या नावाची (वीज बिलावर जे नाव आहे ते) उद्यम नोंदणी करू शकता. नोंदणी केल्यानंतर आपणास ४८ तासात उद्यम नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त होते.

**४. यंत्रमाग उद्योग पिढ़ीजात व परंपरागत स्वरूपचा आहे. जागा मालक वेगळा आणि यंत्रमाग धारक वेगळा आहे. तसेच माझा / आमचा यंत्रमाग उद्योग भाड़ेपट्टी तत्वाने चालविला जातो. यामुळे प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या नावाची नोंद आहे.**

- जे यंत्रमाग घटक जागा भाड़ेपट्टी तत्वाने घेऊन उद्योग चालवत आहेत त्यांचाच जागेबाबत मालक व यंत्रमागधारक वेगवेगळा असण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत यंत्रमागधारकाने सोबत भाडेतत्वाबाबतचा करारनामा खुलाश्यासह जोडावा.
- उपरोक्त परिस्थितीत यंत्रमागधारकाच्या नावाने वीज बिल येत नसल्यास महावितरण यांच्या संकेतस्थळावर नावात बदल करण्याचा अर्ज भरून त्याची छायांकित प्रत प्रपत्र १ ते ५ सोबत सादर करावी. तसेच याबाबाबत खुलासा नमूद करावा. यामुळे यंत्रमाग धारकाची माहिती ग्राह्य धरली जाईल.

**५.एकाच यंत्रमाग धरकाच्या नावावर वेगवेगळ्या ठिकाणी एकापेक्षा जास्त वीज क्रमांक आहेत पण खरेदी विक्री फर्म एकच आहे. अश्या ठिकाणी वीज जोडणी ची उलढाल कशी दाखवावी ?**

यंत्रमाग धारकाच्या नावावर ऐकापेक्षा जास्त वीजग्राहक क्रमांक असल्यास सदरहू घटकाने नोंदणी करतांना एकाच नोंदणी अर्जामध्ये उपलब्ध सर्व वीजग्राहक क्रमांकचे माहिती नमूद करून त्याबाबतचे ग्राहक क्रमांकनिहाय स्वतंत्र वीज देयक, वीज वापर , जी.पी.एस. फोटो, स्वघोषणापत्र इत्यादी माहिती प्रमाणपत्र 1 ते 5 प्रमाणपत्रात सादर करावी.

**६. यंत्रमाग घटकाचे वीज मीटर जोडणी वडील / आजोबा / पूर्वज यांच्या नावावर आहे पण प्रत्यक्ष वापर करणारा वेगळा आहे. या ठिकाणी वापरकर्ता हा अधिकृत वीज ग्राहक नाही.**

- वीज जोडणी ही वरील पूर्वजांचे नावे असल्यास महावितरणकडे नाव बदलाचे ऑनलाईन अर्ज सादर करून अर्जाची छायांकित प्रत 1 ते 5 प्रमाणपत्रामध्ये खुलाश्यासह सादर करावे.

**७. यंत्रमाग धारकांना मशिन सर्टिफिकेटची माहिती भरतांना येणा-या अडचणी.**

- ज्या यंत्रमाग धारकांना मशीन Certificate ची माहिती भरताना त्यांच्याकडे खरेदी पावती अथवा मशीन serial नंबर नाहीत त्यामुळे त्यांना अडचणी येत आहेत. तरी त्यांनी, मशीन Certificate च्या नमुन्यामधील माहिती भरताना, यंत्रमाग धारकाकडे उपलब्ध असणारी माहिती भरावी (यंत्रमाग प्रकार जसे कि Plain Loom / Rapier Loom/Airjet Loom/

Water Jet Loom/ Sulzer Loom आणि यंत्रमागाची संख्या बंधनकारक),तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्या जागी यंत्रमाग धारकांनी Not Available लिहावे.

- सदरहू मशीन Certificate Chartered Accountant/ Charted Engineer अथवा बँक यांना सदर माहिती प्रमाणित करण्यास काहीही हरकत असणार नाही.

## ८. यंत्रमाग धारकांना online/ offline प्रस्ताव सादर करण्यास वरील अडचणी व्यतिरीक्त येणा-या अन्य अडचणी.

- यंत्रमाग धारक जर फक्त Job Work बेसिस यंत्रमाग चालवीत असेल तर कच्चा माल खरेदी बील सादर करू शकत नसल्यास याबाबतचे स्वतंत्र स्वघोषणापत्र 1-5 प्रमाणपत्रात सादर करावे.
- ज्या यंत्रमाग धारकांना online/ offline प्रस्ताव सादर करण्यास अडचणी येत असल्यास त्यांनी प्रादेशिक उप आयुक्त वस्त्रोद्योग कार्यालय येथे जाऊन त्वरित मार्गदर्शन प्राप्त करावे. यंत्रमागधारकांसाठी वीज सवलत नोंदणी करिता, आयुक्तालयाकडून संगणक द्वारे online, offline आणि मोबाईल ॲपव्दारे नोंदणी करण्याची सूविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
- सर्व यंत्रमाग घटकांना त्यांच्या प्रस्तावाची सद्यस्थिती दिसण्याकरीता वस्त्रोद्योग घटकास view option उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
- यासोबतच नोंदणी करतांना येणा-या अडचणी आणि त्याचे निवारण याकरीता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर स्वतंत्र मार्गदर्शक सूचना (user guidelines) उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.
- शासन निर्णय नुसार २७ HP खालील वस्त्रोद्योग घटकांना वीज दर सवलत मंजुरी प्रदान करण्याचे अधिकार आयुक्तालयास आहेत. तसेच २७ HP खालील नोंदणी केलेल्या यंत्रमाग घटकांचे प्रस्ताव त्वरित तपासून मंजुरी प्रदान करण्याची कार्यवाही आयुक्तालयास्तरावर सुरु आहे.